# DEORE ACADEMY

**UPSC/MPSC Coaching Institute.**

**"Your Key To Success".**

Jointly Organized with

Yashorath Test Series For All Competitive Exam

प्रश्नप्रत्रिका क्रमांक

***BOOKLET NO.*** **202102**

**2021**

**Code : YO2**

**PSI/STI/ASO पूर्व सराव परीक्षा**

एकूण प्रश्न : १००

वेळ : १ (एक) तास

सामान्य क्षमता चाचणी

एकूण गुण : १००

Paper No. 2

१.सदर प्रश्नपुस्तिका १०० अनिवार्य प्रश्न आहेत. प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळ्यास ही पुश्नपुस्तिका समवेक्षकांकडून बदलून घ्यावी.

२.आपला परीक्षा – क्रमांक या चौकोनात न विसरता बॉलपेनने लिहावा.

| परीक्षा क्रमांक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | शेवटचा अंक | | |

३. वर छापलेल्या प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेव विशीष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सूचविली असून त्यांना १, २, ३, आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरप्रत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशाप्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर क्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करुन दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉल पेन वापरावे. पेन्सिल व शाईचे पेन वापरु नये.

(ब) आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषामुळे अथवा अन्य कारणामुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमदेवराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नांशी जोडून पहावा.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावी. क्रमांने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे. अशाप्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्याय स्वरुपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्य प्रत्येक चार चकीच्या उत्तरांसाठी एक प्रश्नाचे गण वजा करण्यात येतील.

## ताकीद (नमूना)

या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत नाही. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरुपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिध्द करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या परीक्षामध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम – ८२ यातील तरतुदीनुसार तसचे प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल. व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल तसेच या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपत्रिका अनाधिकृतपणे बाळगणे हा सुध्दा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारी वृंदापैकी तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीय वृंदापैकी असली तरीही अशा व्यक्ती विरुध्द उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.

**Address - MG Road, Diary Don Icecream,**
**Sakhe Baug, Nashik.**

**Swapnil Deore Sir.**

**Contact - 9423383069**

# परीक्षार्थीचे स्व-आकलन

## (PSI/STI/ASO पूर्व सराव सराव परीक्षा)

| अ.क्र. | विषयाचे नाव | एकूण प्रश्न | मी सोडवलेले प्रश्न | बरोबर | चुक | कोणत्या घटकावर चुकले | चुकलेल्या घटकासाठी अभ्यासाचे केलेले नियोजन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राज्यव्यवस्था | | | | | | |
| २. | अर्थव्यवस्था | | | | | | |
| ३. | इतिहास | | | | | | |
| ४. | भुगोल | | | | | | |
| ५. | सा. विज्ञान | | | | | | |
| ६. | गणित व बुध्दीमत्ता | | | | | | |
| ७. | चालू घडामोडी | | | | | | |

➢ मी अशी खात्री देतो की चुकलेल्या घटकावरती अभ्यास करुन भविष्यात त्या चुका टाळेल.

---

**कच्च्या कामासाठी जागा/Space For Rough Work.**

UPSC | MPSC
PSI | STI | ASO

१. अयोग्य विधान/विधाने ओळखा?

अ)घटना समितीची निशानी म्हणून हत्ती स्विकृत करण्यात आला होता.

ब)घटना समितीचे घटनात्मक सल्लागार (कायदेविषयक) म्हणून बी.एन.राव यांची नियुक्ती करण्यात आली.

क)सरदार वल्लभभाई पटेल हे घटना समितीचे सचिव होते.

ड)भारतीय राज्यघटना प्रेमबिहारी नारायण रायजादा यांच्या हस्ताक्षरात आहे. त्यांनी ओघळत्या वळणदार (इटॅलिक) शैलित मुळ राज्यघटनेचे हस्तालिखीत बनविले.

१)अ, ब, क बरोबर  २)अ, ब, ड बरोबर
३)फक्त अ व ड बरोबर  ४)सर्व बरोबर

२. **विधान** :- भारतातील ग्रामीण लोकांच्या जीवनात गुणात्मक सुधारणा करण्यासाठी १९८६ मध्ये केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम करण्यात आला.

**कारण** :- ग्रामीण स्वच्छता हा विषय भारतीय राज्यघटनेच्या समवर्ती सुचीत आहे.

१)विधान व कारण दोन्ही बरोबर आहेत व कारण हे विधानाचे योग्य स्पष्टीकरण देते.

२)विधान व कारण दोन्ही बरोबर आहेत व कारण हे विधानाचे योग्य स्पष्टीकरण देत नाही.

३)विधान बरोबर आहे. पण कारण चूक आहे.

४)विधान चुक आहे, पण कारण बरोबर आहे.

३. **खालीलपैकी अयोग्य विधान/विधाने ओळखा**?

अ)आंतरराज्यीय नदी आणि नदीखोरे यांच्यातील पाण्याचा वापर, वाटप व नियंत्रण यासंबंधीच्या कोणत्याही विवादाच्या किंवा तक्रारीच्या निराकरणासाठी संसद तरतूद करु शकते.

ब)केंद्र व राज्यांच्या समान हितांच्या विषयांचा अभ्यास करण्यासाठी व त्यावर चर्चा करण्यासाठी राष्ट्रपती (कलम - २६३ नुसार) आंतरराज्यीय परिषद स्थापन करु शकतात.

१)फक्त अ अयोग्य  २)फक्त ब अयोग्य
३)दोन्ही अयोग्य  ४)एकही अयोग्य नाही.

४. **भारतातील मुद्रण स्वातंत्र्य** ..................

१)राज्यघटनेच्या कलम - २९ अ मध्ये विशेष तरतुद केली आहे.

२)राज्यघटनेच्या कलम - १९-१-अ ने सुनिश्चित केलेल्या विस्तृत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अध्यावत भागा आहे.

३)राज्यघटनेच्या कलम ३६१- अ च्या तरतुदीने सुनिच्छित केली जाते.

४)देशातील कायद्याच्या राज्याच्या अंमलबजावणी प्रक्रियेत याचा उद्गम आढळतो.

५. **भारतीय राज्यघटनेतील खालीलपैकी कोणत्या तरतुदींचा शिक्षणावर प्रभाव पडतो**?

अ)राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्त्वे

ब)ग्रामिण व नागरी स्थानिक संस्था

क)परिशिष्ट - ५

ड)परिशिष्ट - ६

इ)परिशिष्ट - ७

१)फक्त अ व ब  २)फक्त क, ड, इ
३)फक्त अ, ब आणि इ  ४)वरिल सर्व

६. **खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत**?

अ)जिल्हा सत्र न्यायाधिशाचे न्यायालय हे जिल्ह्यातील सर्वोच्च फौजदारी न्यायालय आहे.

ब)उच्च न्यायालयाशी विचार विनियम करुन राज्यातील जिल्हा न्यायाधिश नियुक्त करतो.

क)सात किंवा त्याहून अधिक वर्षां अनुभव असलेले व्यावसायीक वकिल किंवा केंद्राच्या वा राज्याच्या न्यायीक सेवेतील अधिकारी जिल्हा न्यायाधिशपदी नेमणुकीसाठी असतो.

ड)जेंव्हा सत्र न्यायाधीश मृत्यूदंडाशी शिक्षा देतो त्यावेळी ती अंमलात आणण्यापूर्वी उच्च न्यायालयाच्या पुष्ठीची आवश्यकता असते.

१)अ व ब  २)ब, क व ड
३)अ, क व ड  ४)अ, ब, क व ड

७. **खालीलपैकी कोणती जोडी बरोबर नाही**.

१)कलम - १५३ : राज्यपालाचे पद

२)कलम - १५६ : राज्यपालाचा कार्यकाळ

३)कलम - १५४ : राज्यपालाचे कार्यकारी अधिकार

४)कलम - १५५ : राज्यपालाची पदच्युती

८. **खालील विधानांची शक्यता पडताळून त्याखालील पर्यायांमधून उत्तराचा योग्य पर्याय निवडा**.

अ)बलवंतराय मेहता समितीने १९५८ साली अहवाल सादर केला.

ब)अशोक मेहता समितीने द्विस्तरीय पंचायत राजची शिफारस केली.

क)देशातील राजस्थान या राज्यात सर्वप्रथम पंचायत राजचा शुभारंभ झाला.

ड)महाराष्ट्रात पंचायत राज स्थापनेसंदर्भात १९६० साली वसंतराव नाईक समिती केंद्र शासनाने नेमली होती.

१)फक्त अ बरोबर

२)फक्त अ आणि ब बरोबर

३)फक्त अ ब आणि क बरोबर

४)सर्व पर्याय बरोबर आहेत.

९. **खालीलपैकी कोणते विधान ग्रामसभेला लागू होत नाही**?

१)गावातील सर्व प्रौढ नागरिक ग्रामसभेचे सदस्य असतात.

२)ग्रामसभेच्या बैठकीचे अध्यक्षस्थान सरपंच भुषवितात.

३)सरपंचाच्या अनुपरिस्थितीत उपसरपंच अध्यक्षस्थान भुषवितात.

४)सरपंच व उपसरपंचाच्या अनुपस्थितीत ग्रामसेवक ग्रासभेचे अध्यक्षस्थान भुषवितात.

१०. **लोक अदालती संदर्भात खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत**?

अ)लोक अदालतीने दिलेल्या निर्णय हा दिवाणी न्यायालयात आदेश मानला जातो आणि त्याविरुध्द कोणत्याही न्यायालयात अपील करता येत नाही.

ब)वैवाहिक वा कौटुंबिक विवाद लोक अदालतीच्या अधिकार क्षेत्रात येत नाही.

१)फक्त अ बरोबर  २)फक्त ब बरोबर
३)दोन्ही बरोबर  ४)दोन्ही चूक

११. **विधान** : - भारतीय राज्यघटनेत अल्पसंख्याक या संज्ञेची व्याख्या केलेली नाही.

**कारण** : - अल्पसंख्याक आयोग ही घटनात्कक संस्था नाही.
या बाबतीत योग्य पर्याय निवडा.
१)विधान व कारण दोन्ही बरोबर आहेत, व कारण हे विधानाचे योग्य स्पष्टीकरण देते.
२)विधान व कारण दोन्ही बरोबर आहेत, पण हे विधानाचे स्पष्टीकरण देत नाही.
३)विधान बरोबर, पण कारण चूक.
४)विधान चूक पण कारण बरोबर.

१२. **"वोट ऑन अकाऊंट" व "इंटोरिअम बजेट" यामध्ये काय फरक आहे व त्याबाबतीत खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे**?
अ)नेहमीचे सरकार 'वोट ऑन अकाऊंट' ची तरतूद वापरते तर काळजीवाहू सरकार 'इंटेरिअम बजेटची' किंवा अंतरिम अर्थसंकल्पाची तरतूद वापरते.
ब)'वोट ऑन अकाऊंट' सरकारच्या अर्थसंकल्पातील फक्त खर्चासंबंधी आहे तर 'इंटरिअम बजेटमध्ये' महसूल खर्च दोन्ही असतात.
१)फक्त अ २)फक्त ब
३)दोन्ही अ व ब ४)ना अ, ना ब.

१३. **नगरपांलिकांच्या संदर्भात खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत**?
अ)विविध राज्यात त्यांना विविध नावांनी संबोधले जाते.
ब)राज्य सरकार त्यांचे नियंत्रण करतात.
क)कार्यकारी अधिकारी अध्यक्षाकडे असतात.
ड)या वैज्ञानिक संस्था आहेत.
१)अ, ब व ड २)अ, ब, क, व ड
३)अ व ब ४)अ, ब व क

१४. **खालीलपैकी योग्य विधान/विधाने कोणते**?
अ)प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया (PIT) ची स्थापना १९५० मध्ये झाली.
ब)तिचे मुख्यालय दिल्ली येथे आहे.
क)ती विना-नफ्या तत्वावर कार्य करते.
ड)माहिती आणि बातम्यांचे प्रक्षेपण करण्यासाठी स्वतःचे संज्ञापक उपग्रह इन्सॅट कार्यान्वित करणारी PTI दक्षिण आशियातील एकमेव संसा आहे.
१)फक्त ब आणि ड २)फक्त ब, क व ड
३)फक्त अ व ड ४)सर्व योग्य.

१५. **अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वनवासी (वन अधिकाऱ्यांना मान्यता) कायदा २००६ नुसार व्यक्तीगत किंवा सामुदायिक किंवा दोहोंच्या वन अधिकारांचे स्वरुप व व्याप्ती ठरविण्यासाठी प्रक्रिया सुरु करण्याचे अधिकार कोणाला आहेत**?
१)राज्य वनविभाग
२)जिल्हाधिकारी/आयुक्त
३)तहसिलदार/प्रभाग विकास अधिकारी/मंडळ महसूल अधिकारी
४)ग्रामसभा.

१६. **पंजाब नॅशनल बँकेत आर्थिक घोटाळा झाल्यावर चर्चेत आलेले SWIFT पूर्णनाव काय आहे**?
१)Security of Fund Transfer
२)Statutory World internal Fund Transfer
३)Security World Internal Fund Transfer
४)Society for World Wide Interbank Fianancial Telecommunication Code.

१७. **अर्थसंकल्पा संदर्भात अयोग्य पर्याय निवडा**?
अ)आगामी वर्षाचे वित्तीय नियोजन
ब)लेखा परिणाम
क)आर्थिक विवरण पत्र
ड)समायोजन विधेयक
१)अ, क, ड २)फक्त ब
३)ब आणि ड ४)वरील सर्व

१८. **२०१९ मध्ये प्रधान मंत्री जनधन जे बदल केलेत यासंदर्भात योग्य पर्याय कोणता**?
अ)१०,००० रु सुविधा
ब)२ लाखापर्यंत अपघाती विमा
क)३०,००० पर्यंत जीवन विमा
ड)कर्ज घेण्याची सुविधा
१)अ, ब २)क, ड
३)वरील सर्व ४)अ, ब, क

१९. **भारताचे नवीन राष्ट्रीय लोकसंख्या धोरण यासंदर्भात विसंगत पर्याय कोणता**?
अ)लोकसंख्या कमी करणे.
ब)मृत्यूदरास प्रोत्साहन देणे.
क)संसर्गजन्स आजाराचा प्रसार वाढवणे.
ड)मुलीचे विवाहाचे वय २० वर्षे असेल.
१)वरील सर्व २)यापैकी नाही
३)अ, ब, क ४)अ, क, ड

२०. **राष्ट्रीय हरित लवाद या संदर्भात योग्य पर्याय निवडा**?
अ)सध्याचे अध्यक्ष - आदर्शकुमार गोयल
ब)स्थापना २०११
क)मुख्यालय - दिल्ली
ड)महाराष्ट्रात प्रादेशिक कार्यालय मुंबई या ठिकाणी
१)अ व क २)ब व ड
३)वरील सर्व ४)अ, ब, क

२१. **2000 नवीन राष्ट्रीय लोकसंख्या धोरण यासंदर्भात योग्य पर्याय निवडा**?
अ)२०४५ पर्यंत लोकसंख्या वाढ स्थिर ठेवणे.
ब)२०१० पर्यंत जन्मदर हा मृत्युदराशी समप्रमाणात आणणे.
क)माता मृत्यूदर १०० वर नेणे.
ड)HIV वाढीला दर ०% साध्य करणे.
१)वरील सर्व २)ब, क, ड
३)अ, ब, ड ४)यापैकी नाही.

२२. **भारतातील SEZ संदर्भात योग्य विधान कोणते ते ओळखा**.
अ)SEZ साठी किमान ५०० हेक्टर जमीन आवश्यक
ब)सेवा SEZ ५० हेक्टर जमीन आवश्यक
क)२००० ला SEZ संदर्भात कायदा मंजूर
ड)SEZ ला महाराष्ट्रातून सुरुवात.
१)अ, ब २)ब, क
३)वरील सर्व ४)यापैकी नाही.

२३. **आंतरराष्ट्रीय विकास संघटना (IDA) संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य आहेत ते ओळखा.**
अ)जागतिकी बँकची खाजगी शाखा.
ब)सदस्य देशांना कर्जावर व्याज आकरत नाही.
क)मुख्यालय न्यूयॉर्क या ठिकाणी आहे.
ड)UNO अंतर्गक कार्य करते.
१)फक्त ब २)अ, क, ड
३)वरील सर्व ४)यापैकी नाही.

२४. **महाराष्ट्रातील बायो टेकनॉलोजी पार्कस संदर्भात कोणता पर्याय योग्य आहे ते ओळखा.**
अ)MIDC नाशिक ब)MIDC औरंगाबाद
क)MIDC जालना ड)MIDC हिंजवाडी (पुणे)
१)फक्त ड २)फक्त क, ड
३)वरील सर्व ४)अ, ब, ड

२५. **भारतात सादर केल्या जाणाऱ्या अंतरिम अर्थसंकल्पाच्या संदर्भात अयोग्य विधान कोणते ते ओळखा.**
अ)जास्तीत जास्त ६ महिन्यांची तरतूद
ब)सर्वसाधारण पणे नोव्हेंबर सादर केला जातो.
क)पहिला हंगामी अर्थसंकल्प सी.डी. देखमुख यांनी सादर केला.
१)फक्त अ २)फक्त ब
३)वरील सर्व ४)ब, क

२६. **भारतात सादर केल्या जाणाऱ्या अर्थसंकल्पा संदर्भात योग्य विधान कोणते ते ओळखा.**
अ)फक्त फेब्रुवारीच्या २८ तारखेला सादर
ब)२१ दिवसाच्या आत राज्यसभेची मंजूरी आवश्यक
क)लोकसभा किंवा राज्यसभेत प्रथम सादर केला जातो.
ड)मागील वर्षांच्या जमा खर्चाची तरतूद दाखविली जाते.
१)फक्त अ २)अ, क
३)वरील सर्व ४)यापैकी नाही.

२७. **भारतातील मनरेगा योजना संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे?**
अ)महाराष्ट्राया दुष्काळी भागात १५० दिवसांच्या कामाची हमी.
ब)या योजना अंतर्गत रोजगार भत्ता निश्चित करण्यासाठी प्रणोब सेन समिती स्थापन
क)या योजने अंतर्गत महाराष्ट्रात सर्वात जास्त रोजगार निर्माण करण्यात आला.
ड)२००८ पासून संपूर्ण भारतात लागू.
१)अ, ब २)क, ड
३)वरील सर्व ४)यापैकी नाही.


२८. **राजीव गांधी जीवनदायी संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य आहे ते ओळखा.**
अ)२००७ पासून सुरु करण्यात आली.
ब)बीपीएल व अल्प उत्पन्न गटातील जनतेचा समावेश
क)१०३४ प्रकारच्या उपचारांचा समावेश
ड)महाराष्ट्रात महात्मा फुले आरोग्यदायी योजना म्हणून ओळखली जाते.
१)अ, ब २)क, ड
३)वरील सर्व ४)यापैकी नाही.

२९. **२०१२ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या रंगराजन समितीच्या संदर्भात योग्य विधान कोणते ते ओळखा.**
अ)भारतात दारिद्र्याचे प्रमाण २९.५%
ब)ग्रामीण भागातील कुटुंबाला मासिक खर्च ७०३५ रु
क)शहरी भागातील कुटुंबाचा मासिक खर्च - ४८६० रु
ड)शहरी भागात दारिद्र्याचे प्रमाण - २६.४%
१)फक्त अ, ड २)फक्त ब, क
३)वरील सर्व ४)यापैकी नाही.

३०. **भारतात आकारल्या जाणाऱ्या प्राप्ती करासंदर्भात पुढील विधान योग्य आहे?**
अ)ज्येष्ठ नागरिकांसाठी आयकराची मर्यादा २.५ लाख
ब)१८६१ च्या कायद्यात वापर प्राप्ती करासाठी केला जातो.
क)आयकर हे सर्वात जास्त महसूल मिळवून देणारा प्रत्यक्ष कर.
१)फक्त अ २)फक्त अ, ब
३)वरील सर्व ४)यापैकी नाही.

३१. **योग्य विधान ओळखा.**
अ)वेगनर ते जानेवारी १९१२ रोजी आपला सिध्दांत जगासमोर मांडला १९१५ मध्ये "The Origin of Continents and Oceans" या पुस्तकामध्ये त्यांनी भूखंडवाहनाची संकल्पना विस्तृतपणे मांडली.
ब)याने आपल्या सिध्दान्तांत या एकजिनसी खंडास "Urkontient" असे नाव दिले.
पर्याय उत्तरे :
१)अ २)ब
३)दोन्ही ४)दोन्ही नाही.

३२. **खालील आकृतीनुसार कोणते भुरूप पुढील काळात तयार होऊ शकते.**




पर्यायी उत्तरे :
१)धबधबा २)धावत्या (Rapids)
३)पुरतर ४)घळई (Canyons)

३३. **योग्य विधान निवडा.**
अ)ज्वालामुखीतून बाहेर पडणाऱ्या बेसिक लाव्हाच्या प्रसरण हे अतिशय कमी असते.
ब)ज्वालामुखीतून बाहेर पडणारा हा लाव्हा अगदी कमी वेळेत सामान्य तापमानाला येतो म्हणून या लाव्हा खडकांचे स्फटिक सुस्पष्ट असतात.
पर्याय उत्तरे :
१)अ २)ब
३)अ, ब ४)यापैकी नाही.

**३४. योग्य विधान ओळखा.**

अ)सॅडल हे उत्तर अंदमानात बेटावरील सर्वात उंच शिखर

ब)लक्षद्विप बेट समुहातील बॅरन बेटावरील भारतातील एकमेव जागृत ज्वालामुखी आहे.

क)अंदमान बेटे ही जलमग्न पर्वत शृंखलेची शिखरे आहेत.

पर्याय उत्तरे :

१)अ व ब　　२)अ व क

३)ब, क　　४)अ, ब, क

**३५. पृथ्वीच्या अंतरंगाविषयी योग्य विधाने ओळखा.**

अ)निफे (Nife) थरात सर्वाधिक लोखंड व निकेल खनिज आढळते.

ब)सायमा (Sima) थरात सर्वाधिक ॲल्युमिनियम व सिलिका खनिज आढळते.

क)शिलावरण (LithosPhere) व प्रावरण (Man-He) यांच्या दरम्यानच्या विलगतेस कॉनरॅक विलगता म्हणतात.

पर्याय उत्तरे :

१)अ　　२)ब, क

३)फक्त अ व क　　४)अ, ब, क

**३६. भारताच्या प्रमाण वेळेचे वृत (Indian Standard Time Line) जाणाऱ्या राज्यांचा योग्य पर्याय सांगा.**

१)उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, तेलंगण, ओरिसा, छत्तीसगड

२)उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, आंध्र-प्रदेश, ओरिसा, छत्तीसगड

३)उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, छत्तीसगड, आंध्रप्रदेश, तामिळनाडू

४)मध्यप्रदेश, छत्तीसगड, ओरिसा, तेलंगणा, आंध्रप्रदेश.

**३७. जोड्या जुळवा.**

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | आल्पस पर्वत | i. | माऊंट मिशेल |
| ब) | रॉकी पर्वत | ii. | माऊंट एलब्रुस |
| क) | ॲपलेशियन पर्वत | iii. | माऊंट हर्लॅक |
| ड) | कॉकेशस पर्वत | iv. | माऊंट मॅकिन्ते |

पर्यायी उत्तरे :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | iii | ii | i | iv |
| २) | iv | iii | ii | i |
| ३) | ii | iii | iv | i |
| ४) | iii | iv | i | ii |

**३८. आफ्रिका खंडाबद्दल खालील विधान / विधाने अभ्यासा.**

अ)भूमध्य समुद्र हा फक्त आफ्रिका व आशिया खंड यांच्या मध्ये विस्तारलेला आहे.

ब)लाल समुद्रामुळे ते युरोप खंडापासून वेगळे झाले आहे.

क)या खंडाचा विस्तार पूर्व, पश्चिम व दक्षिण या तीनच गोलार्धात झाला आहे.

ड)किलीमांजरो हे खंडातील सर्वोच्च शिखर आहे.

पर्याय : -

१)अ, क, ड योग्य　　२)ड योग्य

३)क, ड योग्य　　४)सर्व बरोबर

**३९. खालीलपैकी कोणते शीत प्रवाह (Cold Current) आहेत.**

अ)दक्षिण ध्रुवीय प्रदेश　　ब)पेरू प्रवाह

क)विषुववृत्तीय प्रतिप्रवाह　　ड)कॅलिफोर्निया प्रवाह.

पर्याय :-

१)अ, ब, क　　२)अ, ब, ड

३)अ, क, ड　　४)अ, ब, क, ड

**४०.** अ)केंद्रातील कमी दाबाकडे चक्राकार दिशेने वाहणाऱ्या वाऱ्यांना आवर्त वारे (Clone) म्हणतात.

ब)केंद्रातील जास्त दाबाकडून सभोवतालच्या कमी दाबाकडे चक्राकार दिशेने वाढणाऱ्या वाऱ्यांना प्रत्यावर्त वारे (Anti Cyclone) म्हणतात.

वरीलपैकी योग्य विधाने ओळखा.

१)अ　　२)अ, ब

३)ब　　४)दोन्ही नाहीत.

**४१. सागरी लाटांच्या अपक्षरण कार्यामुळे निर्माण झालेली भूरूपे सांगा.**

अ)सागरी गुहा　　ब)सागरी लाटा

क)सागरी कमान　　ड)सागरी स्तंभ

पर्याय : -

१)अ, ब, क　　२)अ, ब, ड

३)अ, क, ड　　४)अ, ब, क, ड

**४२. खालीलपैकी सर्वाधिक तालुके असणारा जिल्हा कोणता?**

१)ठाणे　　२)लातूर

३)औरंगाबाद　　४)सातारा

**४३.** अ)कोकण किनारपट्टीवर नद्यांची मोठे त्रिभूज प्रदेश तयार केले आहेत.

ब)कोकण किनार पट्टीच्या अरबी समुद्रास लागून जो कमी उंचीचा मैदानी प्रदेश आहे त्यास वलारी म्हणतात.

क)महाराष्ट्र पठारावरील नद्यांची बोरी रूंद आहेत.

ड)कोकणातील नद्यांची लांबी दक्षिणेकडे कमी होत जाते.

वरील विधानांपैकी अयोग्य विधाने ओळखा.

१)अ, ब　　२)अ, ब, ड

३)अ, ब, क, ड　　४)क, ड

**४४.** अ)शंभू महादेव पर्वताच्या उंचवट्याच्या भागात सासवडचे पठार आहे.

ब)सातमाळा अजिंठा पर्वतावरील सपाट प्रदेशात बुलढाणा व मोलगाव पठार आहे.

वरीलपैकी विधानांपैकी योग्य विधाने ओळखा.

१)फक्त अ　　२)फक्त ब

३)अ व ब　　४)दोन्ही नाहीत.

**४५.** अ)१९५१ मध्ये भारतात दशलक्ष नगरांची संख्या ७ होती.

ब)२००१ मध्ये, ती संख्या ५३ झाली.

पर्याय : -

१)अ योग्य　　२)अ, ब योग्य

३)ब योग्य　　४)दोन्ही अयोग्य.

**४६. खालील विधाने विचारात घ्या व योग्य नसलेले विधान ओळखा.**

अ)अन्नरक्षणाच्या (Food Storage) धुरीकरण (Smoking) पध्दतीमध्ये मेलॅथिऑनचा फवारा केला जातो.

ब)अन्नरक्षणाच्या किटकनाशक वापर पध्दतीमध्ये (Use of insecticides) धान्याच्या पोत्यांवर अल्युमिनीअम फॉस्फाइड- चा फवारा केला जातो.

पर्यायी उत्तरे :-

१)फक्त अ		२)फक्त ब
३)अ व ब		४)दोन्ही नाही

**४७. खालीलपैकी पाण्यात न विरघळणारी जीवनसत्वे (Fat Soluble or water insoluble vitamines) कोणती नाहीत?**

अ)C	ब)D	क)A
ड)B	इ)E	ई)K

पर्यायी पदार्थ : -

१)अ व ब		२)ब व ड
३)अ व ड		४)इ व ई

**४८. खालीलपैकी कोणत्या जीवाणूंचा (Bacteria) वापर करून समुद्रातील तेलगळती (Oil Leakage) स्वच्छ केली जाते?**

१)Alcanyvorax
२)Yarrowia Lipolytica
३)Saccharomyces cerevisique
४)Penicillium

**४९. योग्य जोड्या जुळवा.**

| | वनस्पती पोषण | | उदाहरणे |
|---|---|---|---|
| अ) | किटकभक्षी (Insectivorous) | i) | भूछत्र (Mushrooms) |
| ब) | परजीवी (Paracitic) | ii) | दगडफूल (Lichen) |
| क) | सहजीवी (Symbiotic) | iii) | डोसेरा (Drosera) |
| ड) | मृतोपजीवी (Saprophytic) | iv) | अमरवेल (Cuscuta) |

पर्यायी उत्तरे : -

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | i | ii | iii | iv |
| २) | iv | iii | ii | i |
| ३) | iv | iii | i | ii |
| ४) | iii | iv | ii | i |

**५०. खालीलपैकी पोषणाच्या टप्प्यांचा (Stage of nutrition) योग्य क्रम कोणता?**

१)Ingestion - Digestion - Egestion - Assimillation- Absorption.
२)Ingestion - Digestion - Absorption - Assimillation - Egestion.
३)Ingestion - Absorption - Digestion - Assimillation- Egestion.
४)Absorption - Ingestion - Digestion - Assimillation - Egestion.

**५१. अयोग्य विधान ओळखा.**

अ)फुफ्फुस धमणी (Pulmonary artery) शुध्द रक्ताचे वहन करते.
ब)फुफ्फुस शीर (Pulmonary vein) अशुध्द रक्ताचे वहन करते.

पर्यायी उत्तरे :

१)फक्त अ		२)फक्त ब
३)अ व ब दोन्ही		४)अ व ब दोन्ही नाही.

**५२. स्त्रियांच्या प्रहतूचक्रामध्ये (Menstrual Cycle) कोणती संप्रेरक (Hormones) महत्वाची भूमिका बजावतात?**

अ)FSH	ब)LH	क)इस्टोजेन
ड)प्रोजेस्टेरॉन	इ)प्रोलॅक्टीन

पर्यायी उत्तरे : -

१)ब, अ, इ, क		२)अ, क, इ, ब
३)इ, ड, ब		४)अ, ब, क, ड

**५३. मधुमेह (Diabetes) या रोगाचे मुख्य कारण कोणते आहे?**

१)इन्सुलनिचा अभाव
२)प्रतिमूत्रक संप्रेरकाचा (ADH) अभाव
३)१ आणि २ दोन्ही
४)ग्लुकंगानचा अभाव

**५४. तापमान (Temperature) साधारण: केलवीन, फॅरेनाइट व सेल्सीअस या एककांत मोजतात. ६८°F तापमान म्हणजे किती केलवीन (K)?**

१)२०K		२)२७३.१५ K
३)२९३.१५K		४)३४१.१५K

**५५. चुंबकीय बलरेषांची (Magnetic Lines of Force) ची कोणती गुणधर्म नाहीत?**

अ)चुंबकीय बल रेषा एकमेकांना दूर ढळलतात.
ब)चुंबकीय बल रेषा एकमेकांना छेदतात. (Intersects)
क)चुंबकीय बल रेषा ह्या काल्पनिक (Imaginary) असतात.

पर्यायी उत्तरे :

१)फक्त ब		२)फक्त अ व क
३)अ व ब		४)ब व क

**५६. खालील विधाने लक्षात घ्या.**

अ)एकसर जोडणीमध्ये (Series Combination) समतुल्य रोध (Average restistance) हा प्रत्येक रोधांपेक्षा लहान असतो.
ब)समांतर जोडणीमध्ये (Parallel Combination) समतुल्य रोध प्रत्येक रोधांपेक्षा मोठा असतो.

पर्यायी उत्तरे :

१)अ बरोबर		२)ब बरोबर
३)दोन्ही बरोबर		४)दोन्ही चूक

**५७. खालील विधाने लक्षात घ्या.**

अ)बर्हिवक्र भिंगाचे (Convex lens) नाभीय अंतर (Focal Length) धन (+) असते.
ब)अंतवर्क भिंगाचे (Concave lens) नाभीय अंतर ऋण (-) असते.

पर्यायी उत्तरे :

१)अ बरोबर		२)ब बरोबर
३)दोन्ही बरोबर		४)दोन्ही चूक

**५८. खालीलपैकी कोणत्या जर्मन रसायन शास्त्रज्ञाने अमोनीयम सायनेट या असेंद्रीय संयुगापासून युरीया (Synthesis of area-from ammonium cynate) बाहेर काढला?**

१)जॅक्स कॉन्टी		२)वोहलर
३)बोहर		४)क्रोटो

**५९. खालीलपैकी विधाने लक्षात घ्या.**

अ)मिश्रणातील (Mixture) घटकांचे गुणधर्म (Properties) कायम राखले जातात.
ब)मिश्रणातील (Mixture) घटकांचे प्रमाण (Amount) निश्चित असते.

पर्यायी उत्तरे :

१)अ बरोबर		२)ब बरोबर
३)अ व ब बरोबर		४)दोन्ही चूक

६०. **रासायनिक अभिक्रियेत वापरल्या जाणाऱ्या उत्प्रेरकासंबंधी (Catalyst) कोणते विधान योग्य आहे?**
१)उत्प्रेरक रासायनिक अभिक्रियेचा दर (Rate of Reaction) कमी करतो.
२)उत्प्रेरक रासायनिक भाग घेतो व अभिक्रिया दर (Rate of Reaction) वाढवितो.
३)उत्प्रेरक अभिक्रियाकारकांच्या कणांचा आकार बदलवतो. (Changes size of molecule.)
४)उत्प्रेरक रासायनिक अभिक्रियेत भाग न घेता अभिक्रियेचा दर (Rate of Reaction) वाढवितो.

६१. अ)१८५७ च्या उठावाबद्दल विचारवंतांची मते याबाबत अयोग्य विधान ओळखा.
ब)संतोषकुमार यांच्या मते "१८५७ चा उठाव म्हणजे केवळ शिपायांचे बंड नसून, तो एक प्रजेचा उठा होता".
क)डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांच्या मते धर्मयुध्द म्हणून सुरु झालेल्या घटनेने शेवटी स्वातंत्र्य युध्दांचे स्वरूप धारण केले.
पर्याय :-
१)फक्त अ योग्य २)फक्त ब योग्य
३)दोन्ही अयोग्य ४)दोन्ही योग्य.

६२. **'लॉर्ड डफरिन' यांच्या बाबत योग्य विधाने ओळखा.**
अ)लॉर्ड डफरिन यांच्या काळात २८ डिंसेबर १८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली.
ब)लॉर्ड डफरिनने जानेवारी १८८६ साली उत्तर ब्रम्हदेश भारतात विलिन करून घेतला.
क)डफरिन यांच्या पत्नीने भारतीय स्त्रियांच्या आरोग्यासाठी लेडी डफरिन फंड स्थापन केला.
पर्याय : -
१)फक्त अ २)फक्त ब व क
३)अ, ब व क ४)वरीलपैकी एकही नाही.

६३. अ)प्राचीन भारतीय संस्कृतीची जोपासना करणे व भारतीयांना त्याची महती पटवून देण्याच्या उद्देशान 'थिऑसॉफिकल सोसायटी' ची कर्नल हेन्टी स्टील अलकॉट व मॅडम ब्लॅव्हात्स्की यांनी केली.
ब)१८७९ मध्ये कर्नल अलकॉट व मॅडम ब्लॅव्हात्स्की स्वीमी दयानंदांच्या निमंत्रणावरून भारतात आले.
वरील विधानावरून योग्य पर्याय ओळखा.
पर्यायी उत्तरे :
१)फक्त अ २)दोन्ही पर्याय योग्य
३)दोन्ही पर्याय अयोग्य ४)फक्त ब

६४. **'१८९२ चा कौन्सिल ॲट' बाबत अयोग्य विधान/विधाने ओळखा.**
अ)१८९२ चा कौन्सिल ॲक्ट म्हणजे १८६१ च्या कॉन्सिल ॲक्टची सुधारित आवृत्ती होय.
ब)याच कायद्यावेळी भारतात लॉर्ड लॉन्सडाऊन हे व्हाईसरॉय होते.
क)या कायद्याने प्रांतिक विधीमंडळाची सदस्य संख्या ८ ते १० इतकी ठरविली होती.
१)फक्त अ २)फक्त ब व क
३)फक्त क ४)फक्त अ व ब

६५. **खालील पर्यायांमधील घटनांचा कालानुक्रमे योग्य क्रम असलेला पर्याय ओळखा.**
१)जातीय निवाडा, रौलेट कायदे, जालियनवाला बाग हत्याकांड, असहकार चळवळ
२)असहकार चळवळ, जातिय निवाडा, रौलेट कायदे, जालियनवाला बाग हत्याकांड
३)रौलेट कायदे, जालियनवाला बाग हत्याकांड, असहकार चळवळ, जातिय निवडा
४)जातिय निवाडा, जालियनवाला बाग हत्याकांड, रौलेट कायदे, असहकार चळवळ.

६६. **खालील विधानापैकी कोणती विधान/विधाने सत्य आहेत.**
अ)शशिपाद बॅनर्जी, नारायण मेघोजी लोखंडे यांनी कामगाराचे
ब)१८८४ साली नारायण मेघोजी लोखंडे यांनी मुंबईत मिल ॲन हॅण्ड असोशिएशन' ही भारतातील कामगारांची पहिली संघटना स्थापन केली.
क)१९१८ साली बी.पी. वाडिया व रामानुज नायडू यांनी 'मद्रास लेबर युनियन' ही कामगार संघटना स्थापन केली.
पर्यायी उत्तरे :
१)फक्त ब व क २)फक्त क
३)वरील सर्व पर्याय सत्य ४)फक्त अ व क सत्य

६७. **स्वदेशी चळवळीचे खालीलपैकी कोणी नेतृत्व केले नाही.**
अ)सुरेंद्रनाथ बॅनर्जी ब)गुरुदास बॅनर्जी
क)महात्मा गांधी ड)आनंदमोहन बोस
इ)सुभाषचंद्र बोस ई)रविंद्रनाथ टागोर
उ)दिनशॉ वाच्छा
पर्यायी उत्तरे :
१)क, इ व उ २)अ, ब व ई
३)क, ड व इ ४)ड, इ व ई

६८. **राष्ट्रीय सभेच्या स्थापनेची खालीलपैकी कोणती कारणे योग्य आहेत?**
अ)१९ व्या शतकातील प्रबोधन युग व धर्मसुधारणा
ब)समाज सुधारकांनी केलेल प्रयत्न
क)पाश्चात्य शिक्षण पध्दतीचा प्रभाव
ड)वृत्तपत्रे व राष्ट्रीय ग्रंथ यांचा प्रभाव.
इ)दळणवळण व भौतिक सुधारणा.
ई)इंग्रजांच्या सत्तापिपासू धोरणाची भारतीयांना जाणीव.
उ)विविध प्रांतातील राष्ट्रवादी संस्था.
पर्यायी उत्तरे :
१)क, ड, इ व उ २)वरील सर्व
३)अ, क, ड व उ ४)ब, क, ड व उ

६९. **पहिल्या गोलमेज परिषदे बाबत योग्य विधान/विधाने ओळखा.**
अ)१० नोव्हेंबर १९३० साली ब्रिटनचे तत्कालन पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांच्या अध्यक्षतेखाली पहिली गोलमेज परिषद लंडनमध्ये सुरू झाली.
ब)पहिल्या गोजमेज परिषदेचे उद्घाटन महात्मा गांधीजीने केले होते.
क)पहिल्या गोलमेज परिषदेला ८९ प्रतिनिधी हजर होते, यापैकी ५७ सरकार नियुक्त आणि १६ संस्थानांचे प्रतिनिधी होते.
पर्यायी उत्तरे :
१)अ व क २)अ व ब

३)फक्त क ४)फक्त ब

**७०. 'क्रिप्स योजनेत' कोणत्या बाबीचा समोवश होता?**

अ)भारतात संघराज्यांची त्वरित निर्मिती करून त्याला वसाहतीचे स्वराज्य देण्यात येईल.

ब)युध्दसमाप्तीनंतर घटनानिर्मितीसाठी धटनासमितीची स्थापना करण्यात येईल.

क)प्रातांना व संस्थानिकांना नवीन संघराज्यात सामील होण्यासंबंधी स्वंयनिर्णयाचा अधिकार देण्यात येईल.

ड)युध्द काळापर्यंत युध्द खात्याखेरीज इतर खाती भारतीयांकडे सूपूर्द करण्यात येतील.

पर्यायी उत्तरे :

१)फक्त क व ड २)अ, ब आणि ड

३)वरील सर्व ४)अ, ब, व क

**७१. 'गोवा मुक्ती संग्राम' याबाबत योग्य विधान/विधाने ओळखा.**

अ)१९२८ मध्ये डॉ.टी.बी. कुन्हा यांच्या अध्यक्षतेखाली गोवा काँग्रेस कमिटीची स्थापना झाली.

ब)२ ऑगस्ट १९५४ ला विश्वनाथ लवांदे, राजाभाऊ वाकणकर, सुधीर फडके, काजरेकर, ना.ग.गोरे, सेनापती बापट, पीटर अल्वारिस, सौ. सुधाताई जोशी इत्यांदी लोकांनी गोव्यात सत्याग्रह केला.

पर्याय :

१)फक्त अ २)दोन्ही पर्याय योग्य

३)फक्त ब ४)दोन्ही पर्याय अयोग्य.

**७२. पुढील घटनांची त्यांच्या कलानुक्रमे यादी करा.**

अ)समता मंच ब)निष्काम कर्ममठ

क)महिला विद्यालय ड)महिला विद्यापीठ

पर्यायी उत्तरे :

१)अ ब क ड २)ड क ब अ

३)क ब ड अ ४)ब क अ ड

**७३. पंडिता रमाबाइर ज्या खूप शिकलेल्या, सुंदर आणि बुध्दीमान होत्या, त्यांच्याबाबत पुढील विधानांपैकी कोणते योग्य नाही?**

१)श्रीनिवास शास्त्री त्यांचा एकुलता एक भाऊ होता.

२)बरेच आय.सी.एस. अधिकारी त्यांच्याशी लग्न करायला तयार होते.

३)त्यांनी बिपीन बिहारीदास यांचेशी लग्न केले.

४)वरील एकही नाही.

**७४. तुरंगात असताना "सुविचार स्मरणी" हा ग्रंथ कोणी लिहिला?**

१)महात्मा गांधी २)गो.ग. आगरकर

३)संत तुकडोजी महाराज ४)यापैकी एकही नाही.

**७५. 'ब्रिटीश लोकांच्या गुणांचे अनुकरण करा पण अंधानुकरण नको' असे कोण म्हणाले?**

१)न्या. रानडे २)विष्णुशास्त्री चिपळूणकर

३)गो.ग. आगरकर ४)महात्मा ज्योतिबा फुले

**७६. राष्ट्रकूल वेटलिफ्टिंग स्पर्धा २०१९ चे खालीलपैकी अयोग्य विधाने ओळखा.**

अ)राष्ट्रकूल वेटलिफ्टिंग स्पर्धा २०१९ या आफ्रिका खंडातील सामोआ देशात पार पाडल्या.

ब)राष्ट्रकूल वेटलिफ्टिंग स्पर्धा भारताने पदतालिकेत प्रथम स्थान व ३५ पदके पटकावले आहेत.

क)मिराबाई चानु हिने या स्पर्धेत ३ रौप्य पदके मिळविले आहेत.

१)फक्त अ २)फक्त ब

३)फक्त क ४)अ व ब

**७७. मॅन बूकर इंटरनॅशनल पुरस्काराबद्दल अचूक विधाने कोणते ते ओळखा.**

अ)हा पुरस्कार २००५ पासून दिला जातो, स्वरुप ५० हजार पाऊंड असे आहे.

ब)२०१९ चा हा पुरस्कार ओमानच्या लेखिका 'जोखा अलयार्थी' व ब्रिटीश भाषांतरकार 'मॅरिलिन बुथ' यांना Calestial Bodies या पुस्तकासाठी देण्यात आला.

क)२०१८ ला हा पुरस्कार ॲना बर्न्स यांना देण्यात आला होता.

१)फक्त अ, ब २)फक्त ब, क

३)फक्त अ, क ४)वरील सर्व अचूक

**७८. खालीलपैकी कोणती विधाने सत्य आहेत ते ओळखा.**

अ)भारतीय रिझर्व्ह बँकेने नवे डेप्युटी गव्हर्नर म्हणून डॉ. मायकेल पात्रा यांची नियुक्ती केली.

ब)मायकेल पात्रा हे तीन वर्ष डेप्युटी गर्व्हनरपदी राहणार.

क)भारतीय रिझर्व्ह बँकेस विविध विभागात ३५ वर्षाचा पात्रा यांचा अनुभव आहे, तसेच ते सध्या पतधोरण समितीचे सदस्य होते.

ड)रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मुख्यालयी एक पूर्ण वेळ गव्हर्नर आणि जास्तीत जास्त ३ डेप्यूटी गव्हर्नर नियुक्त केले जातात.

१)फक्त अ, क, ड सत्य २)फक्त अ, ब, क सत्य

३)फक्त क, ड सत्य ४)वरीलपैकी सर्व सत्य

**७९. भारतीय आंतरराष्ट्रीय विज्ञान महोत्सवबद्दल खालीलपैकी योग्य विधान कोणते ते ओळखा.**

अ)भारतीय आंतरराष्ट्रीय विज्ञान महोत्सव कोलकत्ता येथे आयोजित करण्यात आला.

ब)या महोत्सवाचे आयोजन विज्ञान भारती आणि विज्ञान प्रसार यांनी केले आहे.

क)या महोत्सवाची थिम 'राइझिंग इंडिया : संशोधन नवप्रवर्तन आणि विज्ञान राष्ट्राचे सशक्तीकरण' हे होते.

१)अ व ब २)ब व क

३)अ व ड ४)अ, ब व क

**८०. 'टायगर ट्रायम्फ' बद्दल योग्य विधाने कोणते ते ओळखा.**

अ)भारत आणि अमेरिका यांच्यात टायगर ट्रारम्फ त्रिसेवा युध्द अभ्यासाचे आयोजन आंध्रपदेशात केले गेले.

ब)भारत आणि अमेरिके दरम्यानच हा पहिलाच त्रिसेवा युध्दअभ्यास आहे.

क)त्रिसेवा युध्दसरावात भाग घेण्याची भारताची पहिलीच वेळ आहे.

ड)टायगर ट्रायम्फ त्रिसेवा सरावाचे मुख्य उद्दिष्ट मानवी मदत व आपत्ती निवारण कार्ये हे आहे.

१)अ, ब व क २)ब, क व ड

३)अ, ब व ड ४)अ, ब, क व ड

**८१. मिशन रीच आऊट अभियान बद्दल अयोग्य विधाने निवडा.**

अ)ऑगस्ट २०१९ मध्ये चर्चेत आलेले मिशन रीच आऊट लोकांना मदत करण्याशी संबंधित आहे.

ब)या अभियानांतर्गत जम्मू-काश्मीमधील कलम ३७० हटवल्यानंतर भारतीय सैन्य लोकांना मूलभूत गरजा आणि सेवा पुरवण्याचे काम करत आहे.

क)या मोहिमेद्वारे भारतीय सैन्य जम्मू-काश्मिरमधील खेड्यांमधील गरीब कुटुंबांना पोर्टेबल सौर दिवे उपलब्ध करुण देणे तसेच जम्मू-काश्मिरमधील खेड्यांमध्ये जेथे वीजपुरवठ्यात अडचण आहे. तेथे सैन्याने हे ऑपरेशन केले आहे.

ड)या मोहिमेअंतर्गत भारतीय सैनय लोकांना आरोग्य सेवा तर गरजू लोकांना पाणी पोचविण्याचे कार्य करत आहे.

१)फक्त ब　　२)फक्त अ
३)फक्त क　　४)एकही अयोग्य नाही.

---

**८२. खालीलपैकी अयोग्य विधाने ओळखा.**

अ)१८ सप्टेंबर रोजी 'ई-सिगारेट प्रतिबंध अध्यादेश २०१९' लागू करण्यात आला.

ब)कोणत्याही व्यक्तीने या तरतुदींचे पहिल्यांदा उल्लंघन केल्यास त्याला १ वर्षापर्यंत कारावास किंवा १ लाख रुपयापर्यंत दंड किंवा दोन्ही' अशी शिक्षा होऊ शकते.

क)या तरतुदीचे एखाद्या व्यक्तीने पुन्हा उल्लंघन केल्यास ३ वर्षे कारावास आणि ५ लाख रुपये दंड अशी तरतूद या अध्यादेशात करण्यात आली आहे.

ड)कोणत्याही व्यक्तीने ई- सिगारेटची साठवणूक केल्यास त्याला 'सहा महिन्यापर्यंत कारावास किंवा ५० हजार रुपयापर्यंतचा दंड किंवा दोन्ही' अशी शिक्षेच तरतूद आहे.

१)फक्त अ　　२)फक्त ब
३)फक्त क　　४)यापैकी नाही.

---

**८३. G-7 शिखर परिषदे बद्दल अचूक नसलेले विधान कोणते ते निवडा.**

१)२०१९ साली ४५ वी G-7 शिखर परिषद फ्रान्स मध्ये बिआरिट्झ या शहरात पार पडली.

२)२०१९ च्या ४५ व्या G-७ शिखर परिषदेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे उपस्थित होते.

३)१९७५ साली फ्रान्स, जर्मनी, जपान, ब्रिटन, इटली आणि अमेरिका या सहा देशांची मिळून 'G-६' समुहाची स्थापना झाली.

४)१९७६ मध्ये भारत G-6 चा सदस्य बदला व G-7 असा समुह तयार झाला.

---

**८४. पुस्तक व लेखक यांच्या योग्य जोड्या ओळखा.**

अ)विधानगाथा - डॉ. हर्षवर्धन पाटील.
ब)झंझावत - नारायण राणे
क)गन इसलँड - अमिताव घोष
ड)वि.आर डिसप्लेसड - ग्रेटा थेनबर्ग
इ)द थर्ड पिलर - रघूराम राजन

१)फक्त अ, क, ड, इ　　२)फक्त अ, ब, क, ड
३)फक्त अ, ब, क, इ　　४)फक्त ब, क, ड, इ

---

**८५. नागरिकत्व सुधारणा विधेयक २०१९ बद्दल असत्य विधाने कोणती ते ओळखा.**

अ)नागरिकत्व सुधारणा बिल लोकसभेत ३११ विरुध्द ८० मतांनी मंजूर झाले.

ब)या विधेयकानुसार अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि बांग्लादेश या देशांच्या अल्पसंख्यांकाना नागरिकत्व दिले जाईल.

क)या विधेयकानुसार ६ अल्पसंख्यांक समूदायांना नागरिकत्व प्रदान केले जाईल.

ड)३१ डिसेंबर २०१४ च्या अगोदर भारतात आलेल्या व्यक्तींना नागरिकत्व प्रदान केले जाईल.

१)फक्त ब असत्य　　२)फक्त अ असत्य
३)फक्त क असत्य　　४)एकही असत्य नाही.

---

**८६. जर A +B म्हणजे A हे B चे वडील आहे, A × B म्हणजे A ही B ची आई आहे. A $ B म्हणजे A ही B ची बहीण आहे A≅ B आणि A म्हणजे हा B चा भाऊ आहे, तर पुढीलपैकी कोणते विधान P ही Q ची मुलगी आहे, हे निश्चित करते?**

१)Q + R ≅ P ≅ N　　२)Q × R $ P $ N
३)Q + R $ P ≅ M　　४)यापैकी नाही.

---

**८७. मधू, भोलू, कनू, ज्ञानू, व लू हे सहा मित्र मैत्रिणी षट्कोनाकार क्षेत्राच्या बाजू तयार होतील अशा पध्दतीनेसहा खुर्च्या मांडून बसले आहेत. मधू ज्ञानूच्या समोर व तो कनूच्या शेजारी उजव्या हाताला बसला आहे. मित्रू ही मधू व नलू यांच्या मध्ये बसली असून ती नेमकी भोलूच्या समोर आहे. पुढीलपैकी तीन जोड्या त्यांच्या बसण्याच्या पध्दतीनुसार समान आहेत म्हणून त्यांचा गट होऊ शकतो, तर कोणती जोडी वेगळी आहे?**


१)नलू - भालू　　२)नलू - मधू
३)नलू - मिनू　　४)मधू - भोलू


---


**८८. विविध रंगाच्या, समान आकाराच्या सहा चौरसाकृतींमध्ये विभागलेले कागदाचे तुकडे दिलेले आहेत. त्यांची घडी घालून घनाकृती तयार करता येते. ज्या तुकड्यांपासून बनविलेल्या घनाकृतीच्या समोरासमोरील बाजूंवर निळा आणि पांढरा रंग येईल, असे कागदाचे तुकडे निवडा.**

१)



२)



३)



४)



१)एक आणि तीन दोन्ही　　२)एक आणि चार दोन्ही
३)दोन आणि चार दोन्ही　　४)फक्त एक

---

**८९. अनिल हा CST स्टेशनला उभा आहे. त्या ठिकाणच्या पूर्वेला ५ कि.मी. दूरवर बबन उभा आहे. बबनच्या उत्तरेला ५ कि.मी. अंतरावर चंद्रेशेखर वाट बघत आहे व त्याला ७ कि.मी. अंतरावर**


पूर्वेकडे दादरला जायचे आहे तर CST स्टेशन व दादरमधील सरळ अंतर किती?

१)१७ कि.मी २)१३ कि.मी
३)१२ कि.मी ४)१५ कि.मी

**९०. एका परिक्षेत शेकडा ४० उमेदवार हिंदीत नापास झाले. शेकडा ३० इंग्रजीत नापास झाले. शेकडा १० दोन्ही विषयात नापास झाले. उरलेले विषयात पास झाले तर दोन्ही विषायात पास झालेले उमेदवार किती?**

१)शेकडा ४० २)शेकडा ३०
३)शेकडा १० ४)शेकडा २०


**९१. प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल?**




१)199 २)299
३)219 ४)291

**९२. चौरस पूर्ण करण्यासाठी प्रश्नचिन्हांच्या (?) ठिकाणी नसलेल्या वर्णाक्षरांचा संच निवडा.**

| | | |
|---|---|---|
| G | P | ? |
| K | ? | Q |
| R | ? | L |




**९३. तेलाच्या १० लीटर डब्याची किंमत रु. १००० आहे. त्यावर २५% तेल फुकट मिळाल्यास तेलाची किंमत प्रति लिटर किती होईल?**

१)रु. ७० २)रु. ७५
३)रु. ८० ४)रु. ८५

**९४. 'अ' चे वय 'ब' च्या वयापेक्षा तिप्पट आहे. चार वर्षापूर्वी 'क' चे वय 'अ' च्या तेव्हाच्या वयाच्या दुप्पट होते. चार वर्षानंतर 'अ' चे वय ३१ वर्षे असेल तर 'ब' चे व 'क' चे आजचे वय किती?**

१)१०, ५० २)१०, ४६
३)९, ५० ४)९, ४६

**९५. विजय व त्याची ३ मुले यांच्या वयाची सरासरी १५ वर्षे आहे. सर्वात लहान मुलाचे वय ३ वर्षे आहे. मुलांमध्ये ३-३ वर्षाचे अंतर आहे तर विजयचे वय किती आहे?**

१)४४ वर्षे २)४२ वर्षे
३)४५ वर्षे ४)५० वर्षे

**९६. अनेक लोक, त्यांच्या वडीलधाऱ्यांनी ज्याला अनैतिक वर्तन मानले त्याच्या आधारे ज्यांना ते तरुणाई म्हणून संबोधतात, त्याच्यावर टीका करतात. जग बदलते आहे व त्याबरोबरीचे नैतिक मानकेही बदलली आहेत हे वास्तव या टीकाकारांनी लक्षात घ्यायला हवे. तंत्रज्ञान वेगाने प्रगती होत आहे आणि केवळ त्या जगात वावरणाऱ्या तरुणांनाच त्याचे आकलन होऊ शकते. म्हणूनच त्यांच्या आई-वडीलांनी किंवा आजी-आजोबानी नव्हेत तर त्यांनी स्वत:च नैतिक मानके निश्चित केली पाहिजेत. २५ वर्षावरील कोणीही नाही म्हटले तरी स्वत:च्या भूतकाळात शिकलेल्या गोष्टींमुळे झापडबंद झालेले असणारच. त्यांच्या शिक्षणाने त्यांना आधुनिक जगासंबंधीचा दृष्टीकोन प्राप्त करण्यापासून व त्यला मागणीनुसार प्रतिसाद देण्यापासून प्रतिबंधित केले आहे. म्हणूनच त्यांच्या नैतिक निवाड्यांना काहीही अर्थ उरलेला नाही.**

वरील युक्तिवादाचा सर्वात योग्य मुख्य निष्कर्ष अभिव्यक्त करणारे विधान निवडा.

१)२५ वर्षावरील व्यक्तींनी केलेले नैतिक निवाडे निरर्थक आहेत.
२)२५ वर्षाखालल लोकांनी नैतिक मानके निश्चित करावयला हवीत.
३)ज्याला ज्येष्ठ अनैतिक वर्तन मानतात तो प्रमाद तरुण पिढीकडून घडला आहे.
४)फक्त तरुणांनाच वर्तमानकालीन जगाचे आकलन आहे.


**९७. पहिल्या स्तंभात काही शब्द दिलेले असून दुसऱ्या स्तंभात त्या शब्दांचे संकेत दिलेले आहेत. प्रत्येक संख्या ही एका विशिष्ट अक्षराची निदर्शक आहे. पहिल्या स्तंभातील क्रमानुसारच दुसऱ्या स्तंभातील संकेतांचा क्रम नाही.**


| स्तंभ I(शब्द) | स्तंभ II (शब्द) |
|---|---|
| M O T O R | ५ १ १८ १२ २५ |
| P A S T E | १३ १५ २० १५ १८ |
| L O R R Y | १२ १५ १८ १८ २५ |
| E A R R Y | १६ १ १९ २० ५ |

P A S T E या शब्दचा संकेत कोणता?


१)५ १ १८ १२ २५ २)१३ १५ २० १५ १८
३)१२ १५ १८ १८ २५ ४)१६ १ १९ २० ५


**९८. खालील प्रश्न आकृतीचे जल प्रतिबिंब दर्शवणारा पर्याय निवडा.**




**९९. पुढील षटकोनी कागदाची सोबतच्या प्रतिमेत दाखवल्यानुसार घडी घातली. त्यानंतर त्याला X मध्ये दाखविल्याप्रमाणे विविध ठिकाणी विविध आकाराची छिद्रे पाडली. आता उलगडलेल्या कगदाप्रमाणे दिसणारी प्रतिमा निवडा.**





**१००. चार विद्यार्थ्यांची उंची W, X, Y, Z अशी आहे आणि 2X = W +Z, 2W = X +Y, 2Y = W तर त्यांच्या उंचीनुसार क्रम कसा असेल?**

१)W< Y< X< Z    २)Y< W < X< Z

३)X< Z< Y < W    ४)Z < X < W < Y .

DEORE ACADEMY
UPSC | MPSC
PSI | STI | ASO
UPSC / MPSC / INSTITUTE

**2021**

**Code : YO2**

**PSI/STI/ASO पूर्व सराव परीक्षा**

सामान्य क्षमता चाचणी

वेळ : १ (एक) तास

Paper No. 2

एकूण प्रश्न : १००

एकूण गुण : १००

## Paper No – 2 (Ans Key)

| Question No | Answer | Question No | Answer | Question No | Answer | Question No | Answer |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 26 | 4 | 51 | 3 | 76 | 3 |
| 2 | 3 | 27 | 3 | 52 | 4 | 77 | 1 |
| 3 | 4 | 28 | 3 | 53 | 3 | 78 | 2 |
| 4 | 2 | 29 | 1 | 54 | 3 | 79 | 4 |
| 5 | 3 | 30 | 4 | 55 | 1 | 80 | 3 |
| 6 | 4 | 31 | 3 | 56 | 4 | 81 | 4 |
| 7 | 4 | 32 | 2 | 57 | 3 | 82 | 4 |
| 8 | 3 | 33 | 4 | 58 | 2 | 83 | 4 |
| 9 | 4 | 34 | 2 | 59 | 1 | 84 | 3 |
| 10 | 1 | 35 | 1 | 60 | 4 | 85 | 4 |
| 11 | 2 | 36 | 2 | 61 | 4 | 86 | 2 |
| 12 | 2 | 37 | 4 | 62 | 3 | 87 | 3 |
| 13 | 2 | 38 | 2 | 63 | 2 | 88 | 2 |
| 14 | 2 | 39 | 2 | 64 | 3 | 89 | 2 |
| 15 | 4 | 40 | 2 | 65 | 3 | 90 | 1 |
| 16 | 3 | 41 | 3 | 66 | 3 | 91 | 3 |
| 17 | 1 | 42 | 4 | 67 | 1 | 92 | 1 |
| 18 | 3 | 43 | 1 | 68 | 2 | 93 | 3 |
| 19 | 2 | 44 | 3 | 69 | 4 | 94 | 3 |
| 20 | 1 | 45 | 4 | 70 | 3 | 95 | 2 |
| 21 | 3 | 46 | 3 | 71 | 2 | 96 | 2 |
| 22 | 1 | 47 | 3 | 72 | 3 | 97 | 4 |
| 23 | 4 | 48 | 1 | 73 | 4 | 98 | 2 |
| 24 | 2 | 49 | 4 | 74 | 3 | 99 | 3 |
| 25 | 4 | 50 | 2 | 75 | 3 | 100 | 2 |